**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य मंत्रीमंडळाचा उद्या संध्याकाळी नागपुरात विस्तार, तब्बल ३ दशकांनंतर नागपुरात होणार शपथविधी

- भारतीय राज्यघटना हाच देशाच्या एकतेचा आधार असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं लोकसभेत प्रतिपादन

- विनातारण कृषी कर्जाच्या मर्यादेत ४० हजार रुपयांनी वाढ

**आणि**

- बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी मालिकेत तिसऱ्या सामन्याच्या पहिल्या दिवशी पावसामुळे केवळ १३ षटकांचा खेळ

**<><><><><>**

राज्यातल्या नवनिर्वाचित सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार उद्या रविवारी सायंकाळी चार वाजता नागपूर इथं राजभवनात होणार आहे. येत्या सोमवारपासून राज्य विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन नागपुरात होत आहे. त्याच्या पूर्वसंध्येला हा मंत्रिमंडळ विस्तार केला जाणार आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*मंत्रिमंडळ विस्तारात महायुतीचे एकूण ४० आमदार मंत्रीपदाची शपथ घेण्याची शक्यता आहे. त्यात भाजपच्या २१, शिवसेनेच्या १२ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या १० आमदारांना मंत्रिपदे दिले जाण्याची शक्यता वृत्तसंस्थेनं वर्तवली आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपाचे १३२, शिवसेनेचे ५७ आणि राष्ट्रवादीचे*

*४१ आमदार निवडून आले आहेत. मंत्र्यांची यादी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाकडे पाठवली आहे. तिथून मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित आमदारांना सूचित केलं जाईल, अशी माहिती भाजपा नेत्यांनी वृत्तसंस्थेला दिली. मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर १० दिवसांनी मंत्रीमंडळ विस्तार होतो आहे.*

*मंत्रिमंडळ विस्तार नागपुरात होण्याची ही १९९१ नंतरची पहिलीच वेळ आहे. १९९१ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या मंत्रिमंडळाचा विस्तार नागपूर येथे झाला होता. त्यावेळी छगन भुजबळ यांनी कॅबिनेट मंत्रिपदाची शपथ घेतली होती. तेव्हा मंडल आयोगाच्या अहवालावरून भुजबळांनी शिवसेनेतून बाहेर पडून काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी वृत्तविभागातून मनिषा देवणे.*

**<><><><><>**

भारतातली विविधतेत सामावलेली एकता हे देशाला मिळालेलं एक वरदान असून देशाची राज्यघटना हाच देशाच्या एकतेचा आधार आहे, ही विविधता आपल्या जगण्याचा एक भाग व्हायला हवी, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत राज्यघटनेवरच्या चर्चेला उत्तर देताना केलं आहे. ते म्हणाले,

**बाईटः प्रधानमंत्री**

भारताला स्वातंत्र्य मिळालं, त्या वेळी देशाच्या भविष्याच्या ज्या शक्यता वर्तवण्यात आल्या, त्या सर्व खोट्या ठरवून भारताची राज्यघटनाच आपल्या देशाला इथपर्यंत घेऊन आली. राज्यघटनेचं तत्त्व देशातल्या कोट्यवधी नागरिकांच्या जगण्यात दिसून येतं, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. राज्यघटनेच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त लोकसभेत

याविषयी झालेल्या चर्चेला उत्तर देताना ते बोलत होते. भारतीय समाजव्यवस्थेत लोकशाही हजारो वर्षांपासून रुजलेली आहे, अशी ग्वाही त्यांनी घटनाकर्त्यांच्या मतांच्या आधारे दिली. घटना समितीतल्या १५ सक्रीय महिला सदस्यांनी राज्यघटनेच्या निर्मितीत दिलेल्या योगदानाचं स्मरण करून, इतर लोकशाही देशांमध्ये महिलांना अधिकार द्यायला कित्येक दशकं लागली, मात्र भारतात सुरुवातीपासूनच महिलांना मतदानाचा अधिकार होता, असं प्रधानमंत्र्यांनी नमूद केलं. ७५ वेळा घटनादुरुस्ती करण्यावरून त्यांनी काँग्रेसवर टीका केली. यावेळी त्यांनी विविध उदाहरणं देऊन काँग्रेसच्या आजी माजी नेत्यांवर टीका केली.

**<><><><><>**

भारतीय राज्यघटनाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आज संसदेत राज्यघटनावर चर्चा करण्यात आली. विविध पक्षांच्या खासदारांनी देशाच्या आतपर्यंतच्या वाटचालीवर आणि राज्यघटनाच्या महत्त्वावर आपले विचार मांडले. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजु यांनी भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधान निर्मितीतल्या योगदानाबद्दल गौरवोद्गार काढले. राज्यघटनेनुसार देशातल्या प्रत्येक घटकाला समान अधिकार मिळाले आहेत. अल्पसंख्यकांबाबतही भेदभाव केला जात नाही, हे रिजिजु यानी अधोरेखित केलं.*

*भाजपा राज्यघटनेला कमकुवत करत आहे, अशी टीका लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली. गांधी यांनी बेरोजगारी, अग्नीवीर योजना, मक्तेदार भांडवलशाही, शेतकरी आणि महिलांवरील अत्याचार हे मुद्दे यावेळी उपस्थित केले. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात राजकीय, सामाजिक आणि आर्थिक समता नष्ट झाल्याचा आरोपही गांधी यांनी केला.*

*भाजपाचे खासदार अनुराग ठाकुर यांनी राहुल गांधींचे आरोप फेटाळून लावले. माजी प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी देशात लागू केलेल्या आणीबाणीची आठवण करून देत ठाकुर यांनी काँग्रेसवर टीका केली.*

*द्रमुकचे खासदार ए राजा यांनी लोकशाही, कायदा, धर्मनिरपेक्षता आणि समता या संदर्भातले मुद्दे उपस्थित केले. यावेळी राजा यांनी सत्ताधारी पक्षावर कठोर शब्दात टीका केली. तर काँग्रेसने राज्यघटनेचा वापर काँग्रेसने मतपेढी वाढवण्यासाठी केल्याची टीका शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी केला.*

*केंद्र सरकार आपल्या धोरणाद्वारे देशात आर्थिक असमतोल निर्माण करत असल्याचा आरोप भाकप एमएलचे खासदार राजा राम सिंह यांनी केला. तर भारतीय  राज्यघटनेत समाविष्ट असलेल्या मुल्यांची अंमलबजावणी झाली आहे की नाही याचं आत्मपरीक्षण करण्याची गरज आरएसपीचे खासदार एन के प्रेमचंद्रन यांनी व्यक्त केली.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी वृत्त विभागातून संदेश नाईक*

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं तारणाविना कृषी कर्जाची मर्यादा १ लाख ६० हजार रुपयांवरून २ लाख रुपये करण्याची घोषणा केली आहे. येत्या १ जानेवारीपासून हा निर्णय लागू होईल. यामुळे शेतकऱ्यांना अतिरिक्त आर्थिक सहाय्य प्रदान होईल, असं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

परभणीतल्या हिंसाचाराची सीबीआय चौकशी करावी अशी मागणी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली आहे. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांशी चर्चा केल्यानंतर ते बोलत होते. कोंबिंग ऑपरेशन राबवू नये अशी विनंती केल्याचं त्यांनी सांगितलं आणि नागरिकांना शांतता राखण्याचं आवाहन केलं.

**<><><><><>**

जालना जिल्ह्यात जालना - सिंदखेडराजा  मार्गावर आज दुपारी ट्रक आणि बसच्या  अपघातात बसमधल्या दोन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला तर १८ ते २० जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. अपघातात बसचं मोठं नुकसान झालं आहे.

<><><><>

नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं गुरुवारी रात्री पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत छापे टाकून सुमारे ११ कोटी ८६ लाख रूपये किंमतीचे अंमली पदार्थ जप्त केले. २५ ठिकाणी छापेमारी करून पोलिसांनी अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या आणि देशात बेकायदा राहणाऱ्या १६ आफ्रिकी नागरिकांना अटक केली.

<><><><>

आदिवासी विकास विभागांतर्गत चंद्रपूरच्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या वतीने शासकीय, एकलव्य तसंच अनुदानित आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची सहल इस्रो इथं नेण्यात येत आहे.  १५ ते २० डिसेंबर या कालावधीतील या सहलीत ४२ विद्यार्थी, ४ शिक्षक आणि ४ कार्यालयीन अधिकारी - कर्मचारी प्रवास करणार आहेत.

<><><><>

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यान ऑस्ट्रेलियात गॅबा इथं सुरु असलेल्या बॉर्डर-गावस्कर चषक कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात आज पहिल्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा ऑस्ट्रेलियानं बिनबाद २८ धावा केल्या होत्या. उस्मान ख्वाजा १९ तर नॅथन मॅकस्विनी

४ धावांवर खेळात होते. इथं वारंवार होत असलेल्या पावसाच्या व्यत्ययामुळे आज दिवसभरात केवळ १३ षटकं आणि २ चेंडू एवढाच खेळ झाला. त्याआधी, भारतानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण स्विकारलं. या मालिकेत आतापर्यंत झालेल्या सामन्यांपैकी पहिल्या सामन्यात भारताला २९५ धावांनी विजय मिळाला तर दुसरा सामना ऑस्ट्रेलियानं दहा गडी राखून जिंकला. दरम्यान, आजच्या दिवसाची भरपाई करण्याकरता उद्याच्या दिवसाचा खेळ अर्धा तास लवकर सुरु करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

नाशिकचा पार आज दोन अंशांनी घसरल्यामुळे जिल्ह्यात पुन्हा एकदा थंडीने डोकं वर काढलं आहे. आज ९ पूर्णांक २ दशांश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात किंचित तर विदर्भात तुरळक ठिकाणी उल्लेखनीय घट झाली. सर्वात कमी किमान तापमान वर्धा इथं ८ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

***//<><><><><>//***